# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २१/०८/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. ३१/०७ /२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव** :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. ३१/०७/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | **प्र.सहाय्यक आयुक्त, सहा.आरोग्य अधिकारी व स्वच्छता निरिक्षकांच्या वाहनांना GPS यंत्रणा बसविणेबाबत.** | **ठराव** :- वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात नमुद कामासाठी रक्कम रू, २,९७,०००/-इतक्या अंदाजित खर्चास तसेच दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करण्यास आजची सभा सर्वानमुते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | **सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२०२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेच्या विविध विभागांत तांत्रिक, प्रशासकीय व विकास कामे करण्यासाठी अभिकर्ता नेमणेबाबत प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी कमी दराच्या ई-निविदाधारकासोबत संविदा करणेबाबत.** | **ठराव** :- सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेच्या विविध विभागात तांत्रिक प्रशासकीय विकासकामे करण्यासाठी अभिकर्ता नेमणेबाबत प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी कमी दराच्या ई-निविदा धारकासोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाने मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला प्रस्ताव पाहण्यात आला. प्रस्तावावर विचार विनिमय करुन आजची ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.<br>सामान्य प्रशासन विभाग, तांत्रिक विभाग, अग्निशमन, विद्युत, उद्यान, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय आरोग्य या विभागांसाठी ठेका कर्मचारी तसेच ठेका मजुर पुरविण्यास भाग घेतलेल्या ई-निविदाधारकांपैकी न्युनतम दराचे ठेकेदार खालीलप्रमाणे आहेत.<br>सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत विधी अधिकारी, लिपीक-टंकलेखक, लघुटंकलेखक, दूरध्वनी चालक आणि शिपाई या पदांसाठी मे.रेन्बो कन्स्ट्रक्शन, माहिम, जि.पालघर यांचे दर सर्वात कमी आहेत. तसेच ग्रंथपाल व सहा.ग्रंथपाल पदासाठी मे.रेन्बो कन्स्ट्रक्शन, माहिम, जि.पालघर व मे. दिनकर एंटरप्रायजेस, |

| | | |
|---|---|---|
| | | विरार यांचे दर समान आहेत. तथापि मे. दिनकर एंटरप्रायजेस, विरार यांनी सदर निविदेतुन माघार घेतली आहे. त्यामुळे ग्रंथपाल व सहा. ग्रंथपाल पदासाठी मे.रेन्बो कन्स्ट्रक्शन, माहिम, जि.पालघर यांचे दर सर्वात कमी आहेत.<br>तांत्रिक विभागात कनिष्ठ अभियंता पुरविणेकामी मे. विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेसे प्रा.लि. पुणे यांची सर्वात कमी दराची निविदा आहे.<br>अग्निशमन विभागात मनुष्यबळ पुरविणेकामी मे. देव मामलेदार स्वयंरोजगार सेवा सहसंस्था मर्यादित, ठाणे यांचे दर सर्वात कमी आहेत.<br>विद्युत विभागात विद्युत पर्यवेक्षक, विजतंत्री, तारतंत्री, उद्यान विभागात उद्यान अधिक्षक, सहा.उद्यान अधिक्षक, प्रमुख माळी, आरोग्य विभागात स्वच्छता निरीक्षक पदासाठी तसेच मंजूर पदांसाठी मे. वंसुधरा अर्थमुव्हर्स प्रा.लि., नालासोपारा यांचे दर सर्वात कमी आहेत.<br>वैद्यकिय आरोग्य विभागात आया, कक्ष सेवक, कक्ष सेविका, पदांसाठी मे. आकाश एंटरप्राईस विरार, यांचे दर सर्वात कमी आहेत.<br>उपरोक्त सर्वात कमी /न्युनत्तम दराच्या ठेकेदारांसोबत कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस, त्यांना कार्यादेश देणेस व त्यांचे मासिक देयके अदा करणेस आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>तसेच ही सभा असे निर्देश देत आहे की, उपरोक्त नुसार नेमल्या जाणाऱ्या अभिकर्त्याने/ठेकादाराने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार ठेका कर्मचाऱ्यास वेतन देणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी वेतन अदा करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, संबधित ठेकेदारांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यांत यावी व त्याला काळ्या यादीत टाकण्याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | **केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत सन २०१६/१७ साठी मंजूर असलेला वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील निर्मळ तलावालगतच्या जागेत हरीत क्षेत्र विकसित करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या** | **ठराव** :- उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा करण्यांत आली व असे ठरविण्यांत आले की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सन १६/१७ च्या राज्य वार्षिक कृती आराखड्यातील वरील मंजूर कामी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४.३७% जादा दराची मे एसथेटीक लॅन्डस्केपींग यांची निविदा प्राप्त झाली आहे. सदर निविदा इतर निविदा दराच्या तुलनेत कमी व योग्य असल्याने त्यास ही सभा मान्यता देत असून मे.एसथेटीक लॅन्डस्केपींग यांचे सोबत कामाची संविदा करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | **निविदाधारकासोबत संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | |
| ५. | **वसई विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सुर्या उद्‌भव) टप्पा -१ धुकटन येथे मुख्य रस्ता ते डवली पाडा येथील BPT पर्यंत जाण्यासाठी पोहच रस्त्याचे दुरुस्ती काम करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दरांची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असता मे. ऋषिकेश जिवन पाटील यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०% कमी दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | **वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महिला मेळावे व इतर कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, व्हिडीओग्राफी, फोटोग्राफी इत्यादी व्यवस्था भाडयाने पूरविणे कामी पात्र ई-निविदाकारांबरोबर संविदा करण्यांस मंजुरी बाबत.** | **ठराव** :- महानगरपालिकेने सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० करीता स्टेज मंडप व्यवस्था भाडयाने पुरविणेकामी त्रैवार्षिक दर मागविले असून त्यामधील दरांबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. प्राप्त निविदाकारामधुन मे. बसेरा डिजिटल सिस्टीम प्रा.लि. यांनी निविदा सादर करुन निविदाउघडल्यानंतर माघार घेतली असल्याने त्यांनी भरलेली इसारा रक्कम जप्त करुन दंडनीय कारवाई करण्यांत यावी. तसेच मागील वर्षाचे निविदाकारकांनी सेवा कर भरलेला आहे का? व तो किती भरला आहे? याची माहिती घेण्यांत यावी. गणपती उत्सव तोंडावर असल्याने निविदा मंजुर करणे आवश्यक आहे. त्या करीता गणपती विर्सजन व्यवस्थेपुरते हे दर मंजुर करण्यात येत आहेत. टेंडर समितीने १५ दिवसात आलेले दरांचा पुन:श्च आढावा घेवुन बाजारामधील वास्तव दरांची तपासणी करुन दर वाजवी वाटतील अशाप्रकारची कार्यवाही करावी. तसेच ई-निविदेमधील अनावश्यक वस्तु नको असलेले निविदेमधील घटक वगळुन टाकण्यात यावेत. तसेच गणपती उत्सव असल्याने विर्सजन व्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण होऊ नये. याकरीता निविदेमधील सहभागी निविदाकारांचे पॅनल तयार करुन गणपती विर्सजन कालावधी करीता संविदा करुन काम करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच कमिटीने दरांची पडताळणी करावी दर योग्य वाटले तर पुढे कार्यवाही करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | **वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम,** | **ठराव** :- महानगरपालिकेने सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० करीता चहापान, भोजन व इतर व्यवस्था पुरविणेकामी त्रैवार्षिक दर मागविले असून त्यामधील दरांबाबत विस्तृत चर्चा करण्यांत आली. तसेच मागील वर्षाचे निविदाकारांनी सेवाकर भरलेला आहे का? व तो किती भरला आहे? याची माहिती घेण्यांत यावी. |

| | | |
|---|---|---|
| | शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इत्यादी व्यवस्था करणेकामी ई-निविदाकारांबरोबर संविदा करण्यांस मंजुरी बाबत. | गणपती उत्सव तोंडावर असल्याने निविदा मंजुर करणे आवश्यक आहे. त्याकरीता गणपती विर्सजन व्यवस्थेपुरते हे दर मंजुर करण्यांत येत आहेत. टेंडर समितीने १५ दिवसांत आलेले दरांचा पुन:श्च आढावा घेवुन बाजारामधील वास्तव दरांची तपासणी करुन दर वाजवी वाटतील अशाप्रकारची कार्यवाही करावी. तसचे ई-निविदेमधील अनावश्यक वस्तु व नको असलेले निविदेमधील घटक वगळुन टाकण्यात यावेत. तसेच गणपती उत्सव असल्याने विर्सजन व्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण होऊ नये याकरीता निविदेमधील सहभागी निविदाकारांचे पॅनल तयार करुन गणपती विर्सजन कालावधी करीता संविदा करुन काम करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच कमिटीने दरांची पडताळणी करावी. दर योग्य वाटले तर पुढे कार्यवाही करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि.२४/०७/२०१७ ते ३०/०७/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त मा.स्थायी समितीचे माहितीसाठी. | ठराव :- अग्नीशमन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे सन्मा. सदस्य यांना माहिती अवगत केली आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई- विरार शहर महानगरपालिका